**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २१४ । मंगळवार १९ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322




औषधाच्या ऑनलाईन विक्रीला विरोध, बनावट ओषधांविरुद्ध कठोर कारवाई ,कॉर्पोरेट कंपन्यांच्या रिटेल औषधावरील अतिक्रमणाला विरोध आणि केमिस्ट व्यवसायाचे संरक्षण आणि सन्मान आदी मागण्यांबाबत देशातील सर्व मेडिकल आज २० मी रोजी बंद ठेवण्यात आली होती. अहिल्यानगर येथील मेडिकल आणि एजन्सी बंदमध्ये सहभागी झाले होते. ( छाया- राजू खरपुडे, नगर)

## दरोड्याच्या तयारीतील तिघे जेरबंद

### एलसीबीच्या कारवाईत सव्वादोन लाखांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राहुरी फॅक्टरी परिसरात दरोड्याच्या तयारीत असलेल्या तिघांची टोळी स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केली आहे. आरोपींकडून २ लाख १५ हजार ४२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एकजण पळून जाण्यात यशस्वी झाला.
दिनांक १८ रोजी रात्री एलसीबीचे पथक राहुरी हद्दीमध्ये पेट्रोलिंग करत असताना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, कोल्हार ते राहुरी रोडने एका पांढ-या रंगाची स्विफ्ट कार संशयितरित्या फिरत असून त्यामधील इसम हे डिझेल चोरी करुन दरोडा करण्याचे प्रयत्नात आहेत.

पथकाने तात्काळ राहुरी फॅक्टरी ते कोल्हार रोडने संशयित वाहनाचा शोध घेत वाहन ताब्यात घेतले. त्यात करण राजू उर्फ राजेंद्र साळुंके (वय-२२ वर्षे, रा. नांदुर्खी रोड, शिर्डी), सनी उर्फ सल्ल्या राजेंद्र पवार (वय१९ वर्षे, रा. सावळीविहीर ता.राहाता), जितेंद्र रोहिदास वाघमारे (वय ३३ वर्षे, रा. पिंपळस ता.राहाता) हे आरोपी आढळून आले. तर नीलेश मोकळ (रा.सावळीविहीर ता.राहाता) हा पळून गेला.

आरोपींकडून दोन लाख रुपये किमतीची कार, दोन मोबाईल, व एक स्विफ्ट कार, ३५ लीटर डिझेल व दरोड्याचे साहित्य असा एकूण २ लाख १५ हजार ४२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ताब्यातील आरोपींना राहुरी पोलीस ठाणे येथे हजर करुन, त्यांच्याविरुध्द भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१०(४), ३१०(५) प्रमाणे दरोडा तयारीचा गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, तसेच पथकातील उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोलीस अंमलदार भगवान थोरात, रमीजराजा आत्तार, प्रकाश मांडगे, विशाल तनपुरे, चालक उत्तरेश्वर मोराळे यांनी केली.

## एक जानेवारीपासूनची आयडीए वाढ लागू करा; बीएसएनएल-एमटीएनएल पेन्शनधारकांचे आंदोलन

### रणरणत्या उन्हात पेन्शनधारकांची मानवी साखळी; केंद्र शासनाचे वेधले लक्ष
### जानेवारी ते मार्च २०२६ ची थकबाकी तात्काळ द्या; पेन्शनधारकांची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** ०१ जानेवारी २०२६ पासून देय असलेल्या आयडीए वाढीची तात्काळ अंमलबजावणी करावी, तसेच जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीतील थकबाकी तत्काळ अदा करावी, या प्रमुख मागण्यांसाठी अहिल्यानगर येथील बीएसएनएल/एमटीएनएल पेन्शनधारकांनी बीएसएनएलच्या मुख्य कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. रणरणत्या उन्हात सुमारे २५० पेन्शनधारकांनी मानवी साखळी तयार करून केंद्र शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

कमिटी ऑफ बीएसएनएल/एमटीएनएल पेन्शनर्स असोसिएशन्स अहिल्यानगर शाखेच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. देशव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात बीएसएनएलचे विद्यमान कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनामुळे बीएसएनएल कार्यालय परिसरात काही काळ घोषणाबाजी आणि निदर्शनाने दणाणला.

जिल्हा सचिव आप्पासाहेब गागरे, दत्तात्रय भोर, शंकर घुगे, रवींद्र शिंदे आणि सुधाकर पवार यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त करत पेन्शनधारकांवर अन्याय होत असल्याचा आरोप केला.

आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, सार्वजनिक उपक्रम विभागाने () दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी काढलेल्या आदेशामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. या आदेशानुसार ०१ जानेवारी २०२६ पासून लागू होणारी आयडीए वाढ अधिसूचित करण्यात आली होती; मात्र त्यामध्ये ''आर्थिक परिणाम'' ( ५) संदर्भातील असामान्य अट समाविष्ट करण्यात आली. त्यामुळे प्रत्यक्षात पेन्शनधारकांना वाढीचा लाभ मिळू शकला नाही.

यानंतर देशभरातील सुमारे चार लाख पेन्शनधारकांनी १६ एप्रिल २०२६ रोजी देशव्यापी आंदोलन केले होते. या आंदोलनानंतर डीपीईने २४ एप्रिल २०२६ रोजी नवीन आदेश जारी करून ०१ एप्रिल २०२६ पासून लागू होणारी आयडीए वाढ अधिसूचित केली. विशेष म्हणजे या नव्या आदेशात ''आर्थिक परिणाम'' ही अट वगळण्यात आली. मात्र, ०१ जानेवारी २०२६ पासून देय असलेली आयडीए वाढ अद्याप लागू करण्यात आलेली नसल्याने आणि जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीतील थकबाकीही न मिळाल्याने पेन्शनधारकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

आंदोलनकर्त्यांनी यावेळी दोन प्रमुख मागण्या मांडल्या. त्यामध्ये ०१ जानेवारी २०२६ पासून देय असलेली आयडीए/डीआर वाढ तात्काळ लागू करून जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीतील थकबाकी अदा करावी, तसेच सीसीए कार्यालयांकडून दूरसंचार ■ पान ४ वर

## कवी गोरे यांच्या कवितेतून ग्रामीण संस्कृतीचे जिवंत दर्शन - खासेराव शितोळे

### 'शब्द फुलांची ओंजळ' काव्यसंग्रहाचे प्रकाशन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** संवेदना हृदयात उतरून जेव्हा शब्दरूपी उमटतात, तेव्हा साहित्य आणि काव्यनिर्मिती घडते. काव्य हे साहित्याचे दागिने असून, कमी शब्दांत मोठा आशय व्यक्त करण्याची ताकद कवितेमध्ये असते. विचारांवर विचार करायला लावणारा कवी समाजासाठी महत्त्वाचा असतो. अनुभव जेव्हा अनुभूतीपर्यंत पोहोचतो, तेव्हाच खरी कलाकृती साकारते. ग्रामीण भागातील जीवनाची वास्तवता, अनुभवता आणि कल्पकता कवी सखाराम गोरे यांच्या कवितांमधून प्रभावीपणे उमटते, असे प्रतिपादन माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांनी केले.

ग्रामीण संस्कृती, माणसांमधील जिव्हाळ्याची नाती, आईचे ममत्व, भक्तीभाव आणि ग्रामीण जीवनातील सहज-सोप्या भावविश्वाचा हृदयस्पर्शी आविष्कार घडविणाऱ्या कवी सखाराम गोरे लिखित व गणराज प्रकाशन प्रकाशित 'शब्द फुलांची ओंजळ' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन प्रसंगी अध्यक्षीय भाषणात शितोळे बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय कार्यवाह जयंत येलुलकर, कविवर्य चंद्रकांत पालवे, प्रा. भगवान काटे, प्रकाशक तथा मसाप जिल्हाप्रमुख प्रा. गणेश भगत, कवी सखाराम गोरे, संतोषकुमार गोरे, शिवप्रसाद गोरे, अजय ढमाले, बाळासाहेब चौधरी, सुभाष बर्वे आदी उपस्थित होते. तसेच महानगर ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते. ■ पान ४ वर

## हिंदू देवस्थानांच्या अस्तित्वावर घाला घालणारा 'इनाम निर्मूलन कायदा' तात्काळ मागे घ्या!

### अन्यथा राज्यव्यापी जनआंदोलन छेडणार; महाराष्ट्र मंदिर महासंघाचा थेट इशारा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने प्रस्तावित केलेला 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' हा राज्यातील हजारो हिंदू देवस्थानांचे स्वायत्त अस्तित्व आणि त्यांच्या उत्पन्नाचे स्रोत मुळापासून उखडून टाकणारा आहे, असा आरोप करत या कायद्याच्या विरोधात महाराष्ट्र मंदिर महासंघाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. या लोकशाहीविरोधी मसुद्याचा तीव्र निषेध करत, तो सरकारने विनाशर्त मागे घ्यावा, या मागणीचे निवेदन अहिल्यानगरचे निवासी जिल्हाधिकारी श्री. दादासाहेब गिते यांना देण्यात आले. तसेच जिल्ह्यातील श्रीगोंदा, पाथर्डी, श्रीरामपूर, राहुरी, कर्जत, संगमनेर, पारनेर, शेवगाव आणि नेवासा या ठिकाणीही तहसीलदारांना निवेदने सादर करण्यात आली.

देवस्थानच्या जमिनींचे व्यापारीकरण होण्याची भीती

निवेदनात म्हटले आहे की, स्वातंत्र्यपूर्व आणि छत्रपती शिवरायांच्या काळापासून अनेक राजांनी देवस्थानांच्या दैनंदिन धार्मिक विधींसाठी, अन्नछत्रांसाठी आणि रुढी-परंपरा जोपासण्यासाठी जमिनी इनाम म्हणून दिल्या आहेत. कायद्यानुसार ■ पान ४ वर

## अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना आ. दातेंच्या धडपडीमुळे यश

### पारनेर व नगर तालुक्यातील २८ गावांना मदतीचा दिलासा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्ह्यात मार्च २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या नैसर्गिक संकटात बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत मिळावी यासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा करत प्रभावी प्रयत्न केले.



जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील ३०० गावांमधील तब्बल २७ हजार ६०२ शेतकरी बाधित झाले असून १४ हजार ३४९.३७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. या नुकसानीपोटी सुमारे २५ कोटी २० लाख रुपयांच्या जो मदतीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला होता त्यास मंजुरी मिळाली आहे. पारनेर व अहिल्यानगर तालुक्यातील एकूण २८ गावांतील बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सर ■ पान ४ वर

पारनेर तालुक्यात २३ गावांतील ४ हजार ८६९ शेतकरी बाधित झाले असून ३ हजार ३६९.०७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झालेले होते. त्यासाठी सुमारे ५ कोटी ७८ लाख रुपयांच्या मदतीची मागणी करण्यात आली होती. तसेच अहिल्यानगर तालुक्यातील ५ गावांतील ६४३ शेतकऱ्यांचे ४९८.५८ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते त्यासाठी ८५ लाख रुपयांहून अधिक मदतीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता दोन्ही प्रस्तावास मंजुरी देण्यात आली असून मतदारसंघातील बाधित शेतकऱ्यांना संबंधित अनुदान लाभ मिळणार आहे.

आ. काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)

## दै. आकर्षण निवडक

### संगमनेरचा पाणी- वीज प्रश्न पेटला



**अहिल्यानगर - संगमनेर तालुक्याला भंडारदरा व निळवंडे धरणाचे हक्काचे पाणी मिळावे, रोटेशन काळात शेतीसाठी पूर्ण दाबाने ११ तास वीजपुरवठा करावा तसेच शेतकऱ्यांना तातडीने पिकविमा मंजूर करावा, या प्रमुख मागण्यांसाठी संगमनेर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना निवेदन दिले.महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते तथा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्याने प्रतिकूल परिस्थितीतही विकासाची वाटचाल केली आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून तालुक्याच्या पाणी व वीज प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या आंदोलनात्मक निवेदनावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले, राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष बाबासाहेब ओहोळ, शेतकी संघाचे चेअरमन संपतराव डोंगरे, फेडरेशनचे चेअरमन राजेंद्र गुंजाळ, ॲड. नानासाहेब शिंदे, मीननाथ वर्पे, विनोद हासे, सतीश वर्पे, गुलाबराव देशमुख, विलास शिंदे, अण्णासाहेब राहिंज, बाळासाहेब राहणे, नामदेव शिंदे, दादासाहेब देशमुख, भाऊसाहेब शिंदे, मुकेश काकड, दत्तात्रय वाघ, कैलास इंगळे, रावसाहेब काकड, जगन दिघे, शांताराम दिघे, कचरू लांडगे, नवनाथ देशमाने, भास्करराव पानसरे, शेखर वाघ, बाळासाहेब फापाळे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. त्यानंतर वीज वितरण विभागाच्या मुख्य अधीक्षक अभियंत्यांनाही निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, संगमनेर तालुका हा पर्जन्यछायेतील, डोंगराळ व अतिदुष्काळी भाग असून येथे दरवर्षी सरासरी दहा इंचांपेक्षाही कमी पाऊस पडतो. मोठ्या संघर्षानंतर १९८९ मध्ये संगमनेर तालुक्याला हक्काचे ३० टक्के पाणी मंजूर झाले होते. तसेच उपसा सिंचन योजनांसाठी आवर्तन काळात दररोज किमान १६ तास वीजपुरवठा आवश्यक असल्याचे आदेश असतानाही प्रत्यक्षात पुरेशा वीजेचा पुरवठा होत नसल्याची तक्रार करण्यात आली.**

### राज्यस्तरीय भीमथडी साहित्य संमेलनात डोंगरे यांना प्रमुख पाहुण्याचा मान

**अहिल्यानगर - ग्रामीण भागातील साहित्य, समाजकारण आणि जनजागृतीच्या चळवळीला सातत्याने बळ देणारे सामाजिक कार्यकर्ते तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांना चौफुला केडगाव (ता. दौंड, जि. पुणे) येथे आयोजित राज्यस्तरीय भीमथडी साहित्य संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. दि. २३ व २४ मे रोजी दोन दिवस चालणाऱ्या या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे उद्घाटन आमदार राहुल कुल यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनात उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, खासदार सुप्रियाताई सुळे, राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर, ज्येष्ठ साहित्यिक फ. मु. शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती संमेलनाचे मुख्य संयोजक दशरथ यादव यांनी दिली.या संमेलनातील कवी संमेलनाच्या विशेष सत्रात पै. नाना डोंगरे यांना 'मान्यवर पाहुणे' म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील नवोदित साहित्यिक, कवी आणि सामाजिक कार्यकर्त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. साहित्य चळवळीला चालना देण्याबरोबरच ग्रामीण भागात सांस्कृतिक वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत.पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात विविध सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण भागात वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांमुळे पर्यावरण संवर्धनाची व्यापक जनजागृती झाली आहे.स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जनजागृती, जलसंधारण अभियान, रक्तदान शिबिरे यांसारख्या उपक्रमांद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे.**

# घर-घर लंगर सेवेच्या अन्न छत्रालयाला पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट

**कोरोना काळापासून सुरू असलेल्या निस्वार्थ सेवाकार्याचे कौतुक**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान संचलित घर-घर लंगर सेवेच्या तारकपूर येथील अन्न छत्रालयाला पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भेट देत संस्थेच्या कार्याची पाहणी केली. कोरोना महामारीपासून सुरू असलेल्या या सेवाकार्याचा आढावा घेत त्यांनी संस्थेच्या निस्वार्थ सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते, नगरसेवक मोहित पंजाबी, जीतू गंभीर, जय भोसले, लंगर सेवेचे जनक आहुजा, हरजितसिंह वधवा, राजेंद्र कंत्रोड, मुन्नाशेठ जग्गी, राजू जग्गी, सतीश गंभीर, प्रशांत मुनोत, सुनील थोरात, राजा नारंग, गुलशन कंत्रोड आदी मान्यवर उपस्थित होते.

तारकपूर येथील अन्न छत्रालयात दररोज गरजू, निराधार, कामगार, रुग्णांच्या नातेवाईकांसह अनेक गरजूंना मोफत भोजन उपलब्ध करून दिले जाते. कोरोना महामारीच्या कठीण काळात अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असताना घर-घर लंगर सेवेने हजारो नागरिकांपर्यंत अन्न पोहोचवून मानवतेचे दर्शन घडविले होते. आजही ही सेवा त्याच समर्पणाने सुरू असल्याने सामाजिक क्षेत्रात या उपक्रमाची विशेष ओळख निर्माण झाली आहे.

यावेळी बोलताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, घर-घर लंगर सेवेने कोरोना काळात भुकेल्यांच्या सेवेसाठी अपार परिश्रम घेतले. अनेक स्वयंसेवकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून गरजूंना अन्न पोहोचविले. संकटकाळात समाजाच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी मानवसेवा असून, श्री गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठानने हे कार्य सातत्याने जपले आहे. ही सेवा आजही तितक्याच ताकदीने सुरू असून, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचे कार्य संस्था करीत असल्याचे त्यांनी नमूद केले.

आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, कोरोनाच्या पहिल्या लाटेपासून घर-घर लंगर सेवा सातत्याने भुकेल्यांना अन्न, गरजू कुटुंबांना आधार आणि संकटग्रस्तांना मदत देत कार्यरत राहिली आहे. नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीतही संस्थेने पूरग्रस्त नागरिकांना मदतीचा हात दिला. सामाजिक बांधिलकी जपत निरपेक्ष भावनेतून कार्य करणाऱ्या या उपक्रमामुळे अनेक गरजू नागरिकांना दिलासा मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत जनक आहुजा यांनी केले. त्यांनी घर-घर लंगर सेवेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा घेतला. अन्न छत्रालयामार्फत दररोज शेकडो गरजूंना मोफत भोजन उपलब्ध करून दिले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच सामाजिक सलोखा, मानवसेवा आणि परस्पर सहकार्य या मूल्यांच्या आधारे संस्था विविध उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अन्न छत्रालयाची पाहणी करून स्वयंसेवकांशी संवाद साधला. अनेक गरजू नागरिकांसाठी सुरू असलेली ही सेवा समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# जायंट्सने शहरातील सामाजिक चळवळ अधिक व्यापक केली – संजय गुगळे

**जायंट्स वेलफेअर फाउंडेशनच्या द्वितीय कौन्सिल मीटिंगला उत्स्फूर्त प्रतिसाद**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जायंट्स वेलफेअर फाउंडेशन फेडरेशन २ ची द्वितीय कौन्सिल मीटिंग व सहेली सिम्पोझियम शहरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. फेडरेशन कौन्सिलच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह राज्यभरातील महिला प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत सामाजिक क्षेत्रात करण्यात आलेल्या कार्याचा आढावा घेतला. महिला सक्षमीकरण, सामाजिक बांधिलकी, बचतीचे महत्त्व आणि निरोगी जीवनशैली या विविध विषयांवर या कार्यक्रमात मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व जायंट्स प्रार्थनेने झाली. याप्रसंगी फेडरेशनचे अध्यक्ष जुगलकिशोर हरकुट, फेडरेशन सचिव सन्मती जैन, स्पेशल कमिटी मेंबर विनोद शेवतेकर, जगन्नाथ साळुंके, सहेली सिम्पोझियमच्या इन्चार्ज श्रीमती सूर्यमाला मालानी, संजय गुगळे, सचिव सन्मती जैन, अनघा अंबेकर, रंजना भावसार, रत्नाकर महाजन, सुरेखा अग्रवाल, सरिता मालानी, शीतल अग्रवाल, पायल गांधी, भावना मोहित कटारिया, नरेश गुप्ता, बलवंत शिंदे, अहिल्यानगर जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सचिव अमित मुनोत, प्रशांत मालाणी, संजय सराफ, अनघा आंबेकर, रंजना भावसार, ऑफिसर बलवंत शिंदे, अभय मुथा, डॉ. विनय शहा आदींसह फेडरेशन कौन्सिलचे सर्व पदाधिकारी व महिला प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात बोलताना अहिल्यानगर जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया यांनी महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत विकासाची संधी पोहोचविण्याच्या उद्देशाने संस्थेचे कार्य सुरू असून, सक्षम भारत घडविण्यासाठी लहान मुलांना चांगले शिक्षण, संस्कार आणि सर्वांगिण जडणघडण मिळावी यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

संजय गुगळे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, जायंट्स वेलफेअर फाउंडेशन ही सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी पहिली भारतीय संस्था असून, या संस्थेमुळे महिलांना मोठ्या प्रमाणात सामाजिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाली आहे. भारतात निर्माण झालेल्या या संस्थेने परदेशातही आपले नेटवर्क उभारले आहे. महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी संस्था सातत्याने कार्यरत आहे. शहरात अनेक दिग्गज मंडळींनी या संस्थेची धुरा यशस्वीपणे सांभाळली असून, आपण गेली ४० वर्षे जायंट्समध्ये कार्यरत असल्याचे सांगत ही सामाजिक चळवळ अधिक व्यापक होत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सहेली सिम्पोझियमच्या इन्चार्ज सूर्यमाला मालाणी यांनी महिलांच्या योगदानाचा गौरव करताना सांगितले की, महिलांनी कौटुंबिक जबाबदाऱ्या उत्तमपणे सांभाळत सामाजिक कार्यातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. सहेली सिम्पोझियमच्या माध्यमातून देशभरातील महिला एकत्र येऊन सामाजिक व सांस्कृतिक विचारांची देवाणघेवाण करतात आणि सामाजिक चळवळीला नवी ऊर्जा देतात. महिलांकडून बचतीची सवय शिकण्यासारखी असून, आर्थिक प्रगतीसोबत बचतही तितकीच महत्त्वाची आहे. संकटकाळात हीच बचत उपयोगी पडते, असे सांगत त्यांनी देशासमोरील विविध आव्हानांच्या पार्श्वभूमीवर बचतीचा संदेश दिला.

# अचीवर्स स्पोर्ट्स अकॅडमीच्या १२ खेळाडूंची ब्लॅक बेल्ट परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बारामती येथे नुकतेच पार पडलेल्या डॅन ग्रेडेशन परीक्षेत अहिल्यानगरच्या अचीवर्स स्पोर्ट्स अकॅडमीच्या १२ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत ब्लॅक बेल्ट परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली. त्यांच्या या यशामुळे कराटे व क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या यशस्वी खेळाडूंना अचीवर्स स्पोर्ट्स अकॅडमीचे संस्थापक व प्रशिक्षक आदित्य क्षीरसागर तसेच उपाध्यक्ष आशिष केदारी यांचे मार्गदर्शन लाभले. कठोर सराव, शिस्त आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर विद्यार्थ्यांनी ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली.

या परीक्षेत शोदान (प्रथम ब्लॅक बेल्ट) उत्तीर्ण झालेले खेळाडू पुढीलप्रमाणे इरा साळुंके, सान्वी साळुंके, श्रद्धा मूळे, रुद्रप्रताप मूळे, वेदांत जाधव, प्रणिती इघे, प्रतीक मोढवे, अथर्व बेद्रे, समर्थ सूर्यवंशी, जिया पटेल आणि कृतिशा बोर्डे. तसेच निदान (द्वितीय ब्लॅक बेल्ट) परीक्षेत ओंकार नर्हे यांनी यश संपादन केले.

ही परीक्षा ट्रॅडिशनल शोतोकान अँड स्पोर्ट्स कराटे ऑर्गनायझेशन (टी.एस.एस.के.ओ. इंडिया) चे अध्यक्ष शिहान रवींद्र करळे तसेच टेक्निकल डायरेक्टर शिहान विनय बोढे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

यावेळी बारामती येथील शरयू फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. शर्मिला पवार यांच्या हस्ते सर्व यशस्वी खेळाडूंना ब्लॅक बेल्ट, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले.

# मानवतेचा संदेश देणारे अल्ताफ सय्यद 'संत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार' ने सन्मानित

**दोन दशकांपासून निस्वार्थ सामाजिक कार्य; कोरोना काळातील योगदानाची विशेष दखल**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** समाजात माणुसकी, ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश देत गेली दोन दशके निस्वार्थ सामाजिक कार्य करणारे मानवता हाच एक धर्म प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अल्ताफ सय्यद यांना स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेच्या वतीने प्रतिष्ठेचा 'संत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. विविध सामाजिक, शैक्षणिक आणि मानवतावादी उपक्रमांच्या माध्यमातून समाजात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांचा हा सन्मान करण्यात आला.

निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सहाव्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे यांच्या हस्ते अल्ताफ सय्यद यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी साहित्यिक प्रतिभा खैरनार, युवा किर्तनकार ह.भ.प. दिपाली गणगे-कोकाटे, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, कवी संमेलनाचे अध्यक्ष चंद्रकांत चाबुकस्वार, माजी सरपंच साहेबराव बोडखे, डॉ. विजय जाधव, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, उद्योजक दिलावर शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

अल्ताफ सय्यद हे गेल्या २० वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत असून, समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांसाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहेत. विशेषतः कोरोना महामारीच्या काळात त्यांनी केलेल्या सेवाकार्याची मोठी दखल घेण्यात आली होती. संकटाच्या कठीण काळात अनेक कुटुंबांपर्यंत अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू आणि आर्थिक मदत पोहोचवून त्यांनी हजारो नागरिकांना आधार दिला.

शरद पवार विचार मंचच्या माध्यमातून त्यांनी अनेक गरजू कुटुंबांना मदतीचा हात दिला. कोरोना संकटाच्या पहिल्या लाटेपासून त्यांनी फ्रंटलाइन वर्कर्ससाठीही मोठे योगदान दिले. बूथ हॉस्पिटलला आवश्यक साहित्य पुरविणे, पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना एनर्जी ड्रिंक, मास्क, सॅनिटायझर आणि इतर आवश्यक साहित्य उपलब्ध करून देत त्यांनी संकटकाळात समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी सिद्ध केली.

समाजात वाढत चाललेल्या जातीय आणि धार्मिक द्वेषाच्या पार्श्वभूमीवर अल्ताफ सय्यद यांनी 'मानवता हाच एक धर्म प्रतिष्ठान'ची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून समाजात ऐक्य, बंधुता आणि माणुसकीचा संदेश पोहोचविण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. धर्म, जात, पंथ यापलीकडे जाऊन सर्वसामान्यांना मदत आणि आधार देण्याचा प्रयत्न संस्थेमार्फत केला जात आहे.

# रेल्वे धक्क्यावर माथाडी कामगारांचा जीव धोक्यात घालून काम करण्यास नकार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विळद रेल्वे माल धक्का येथे नोंदित माथाडी कामगारां कडून जीव धोक्यात घालून काम करून घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप करत रेल्वे माल धक्का कामगारांनी प्रशासना विरोधात संताप व्यक्त केला आहे. सहाय्यक कामगार आयुक्त तथा माथाडी मंडळाचे अध्यक्ष रेवणनाथ भिसले यांनी हुंडेकरी वाहतूक ठेकेदार यांच्याशी संगनमत करत कामगार विरोधी आदेश काढला असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. याबाबत कामगारांनी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना निवेदन दिले आहे. पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना देखील निवेदन पाठविण्यात आले आहे.

धोकादायक काम करताना कामगारांचा मृत्यू झाल्यास दोषी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीनंतर बोलताना ठाकरे शिवसेना कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे यांनी कामगारांच्या वतीने केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, विळद रेल्वे माल धक्का येथे प्लॅटफॉर्म नसताना थेट वॅगन मधून माल जमिनीवर उतरवून पुन्हा ट्रकमध्ये भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. हे काम अत्यंत धोकादायक असून यामुळे कामगारांच्या जीविताला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार ? आजपर्यंत कामगारांनी प्रामाणिकपणे सेवा दिली आहे. मात्र अमानवी आणि जीवघेण्या पद्धतीने काम करण्यास भाग पाडणे चुकीचे आहे. त्याऐवजी वॅगन ते ट्रक थेट लोडिंगची व्यवस्था करण्यासाठी संबंधित हुंडेकरी व वाहनधारकांना प्रशासनाने निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

पालकमंत्र्यांची दिशाभूल :

कामगार कार्यालयाचे काही ठराविक अधिकारी जाणीवपूर्वक पालकमंत्री यांना चुकीची माहिती देऊन दिशाभूल करत आहेत की काय अशी शंका आम्हाला आहे. पालकमंत्र्यांनी कामगारांशी संवाद साधावा. बैठक लावावी. कामगारांना न्याय देण्याची भूमिका घ्यावी, असे विलास उबाळे यांनी म्हटले आहे.

भूमिपुत्र कामगारांना हाकलून परप्रांतीयांना आणण्याचा डाव'' :

निवेदनात सहाय्यक कामगार आयुक्तांच्या ८ मे २०२६ च्या आदेशावर ही तीव्र आक्षेप घेण्यात आला आहे. स्थानिक नोंदित माथाडी कामगारांनी काम न केल्यास इतर कामगारांकडून काम करून घेण्यास व नव्या माथाडी कामगारांची नोंदणी करण्यास मुभा देण्यात आल्याचा उल्लेख करत, ''स्थानिक भूमिपुत्र कामगारांना हटवून परप्रांतीय कामगारांना आणण्याचा कट रचला जात आहे,''

# ज्येष्ठांचे ज्ञान व अनुभव नवीन पिढीला कायम मार्गदर्शक - शैलेश मुनोत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** समाजातील ज्येष्ठ व्यक्तींचे ज्ञान व अनुभव नवीन पिढीला कायम मार्गदर्शक असते. मार्केट यार्ड येथील प्रसिद्ध व्यापारी तथा जैन ओसवाल पतसंस्थेचे माजी चेअरमन व विद्यमान तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांना प्रेरणा देणारे आहे. सहकार महर्षी स्व. सुवालालजी गुंदेचा यांचे निकटवर्तीय असलेल्या गुगळे यांनी पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवी वाटचालीत महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनाचा संस्थेला फायदा होतो. याशिवाय सामाजिक कार्य करताना जय आनंद महावीर युवक मंडळाच्या उपक्रमांसाठीही त्यांचे मार्गदर्शन मिळते. गुगळे यांच्यासारखे अनुभवी व्यक्तीमत्व समाजाला कायम दिशा देतात असे प्रतिपादन जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी केले.

सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे माजी चेअरमन तथा विद्यमान तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे यांचा वाढदिवसानिमित्त नवीपेठ येथे शैलेश मुनोत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जैन ओसवाल पतसंस्थेचे पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन शैलेश गांधी, संचालक संतोष गांधी, मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, बाबालाल गांधी, सुरेश फिरोदिया आदी उपस्थित होते.

शैलेश गांधी म्हणाले की, शांतीलाल गुगळे हे पतसंस्थेच्या प्रगतीसाठी कायम महत्त्वाचे मार्गदर्शन करतात. स्व. सुवालालजी गुंदेचा यांना अभिप्रेत शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह कारभारासाठी ते कायम आग्रही असतात. त्यामुळेच संस्थेने यशस्वीपणे रौप्य महोत्सवी वाटचाल केली आहे.

सत्काराला उत्तर देताना शांतीलाल गुगळे म्हणाले की, आज डिजिटल तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात तरूणाई नाविन्यपूर्ण विचार मांडत असते. या आधुनिक विचारांना अनुभवाची जोड मिळाली तर कोणतीही संस्था नक्कीच प्रगती करते. तरूणाई सोबत सामाजिक कार्य तसेच पतसंस्थेत काम करताना मनस्वी आनंद मिळतो. स्व. सुवालालजी गुंदेचा यांनी दूरदृष्टीने स्थापन केलेल्या पतसंस्थेच्या यशस्वी वाटचालीत योगदान देताना अभिमान वाटतो.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगर इस्कॉनतर्फे भागवत कथा महोत्सव; येत्या सोमवारपासून आयोजन



अहिल्यानगर - आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाच्या (इस्कॉन) अहिल्यानगर शाखेच्या पुढाकाराने अधिक मासानिमित्त श्रीमद् भागवत कथा महोत्सवाचे आयोजन येथे करण्यात आले आहे. येत्या सोमवारपासून (२५ मे) ते रविवार ३१ मे २०२६ या काळात रोज सायंकाळी साडेपाच ते साडेआठ या वेळेत पुणे इस्कॉनचे मार्गदर्शक रेवतीनंदन दास यांची प्रवचने होणार आहेत. नवीन टिळक रस्त्यावरील माऊली सांस्कृतिक भवनात (नंदनवन लॉन्स शेजारी, अहिल्यानगर) येथे हा कथा महोत्सव होणार आहे. कीर्तन, कथा, आरती व महाप्रसाद उपक्रम यात होणार आहेत. गिरीवरधारी दास, डॉ. सतीश फाटके, वैष्णवतोष्णी दास व अंजली राधादेवी दासी यांच्यासह अन्य सदस्यांच्या पुढाकाराने हा उपक्रम होणार आहे. अधिक माहितीसाठी ९६७३३९३८७२ यावर संपर्क साधावा. या श्रीमद् भागवत कथा महोत्सवात भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच श्रीमद् भगवतगीता आणि श्रीमद् भागवतम् यावर आधारित साप्ताहिक सत्संग कार्यक्रम दर बुधवारी संध्याकाळी ७ ते ८.३० या वेळेत डॉ. सतीश फाटके यांच्या निवासस्थानी असलेल्या सत्संग केंद्रात (वृंदावन बंगला, पॅरेडाईज हॉटेलसमोर, नवीन टिळक रोड, अहिल्यानगर) होतो. या सत्संगानंतर महाप्रसाद वाटप होते. यातही भाविकांनी सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९८९०६८८६७५.

### नीट पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करा; बहुजन समाज पार्टीची मागणी



अहिल्यानगर- नीट (-) परीक्षेमधील महाघोटाळा, पेपरफुटी आणि भ्रष्टाचाराची निष्पक्ष चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी बहुजन समाज पार्टीच्या वतीने करण्यात आली. या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली. या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांना देण्यात आले असून, त्यांच्या मार्फत राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले आहे.नीट (-) परीक्षेमधील कथित महाघोटाळा, पेपरफुटी आणि भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ बहुजन समाज पार्टीच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनिल ओहळ, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, जिल्हा महासचिव राजू शिंदे, निलेश घोडके, फिरोज शेख, बाळकृष्ण काकडे, राम ससाणे, शिवम साळवे, राहुल हरिभगत, उस्मान शेख, राहुल पटेकर, सुरेश गायकवाड, संतोष मोरे, नवनाथ साळवे, छबु मोरे, मच्छिंद्र बर्डे, दत्ता साळवे, अनिल लष्करे, गणेश बागल, श्याम आवटी आदी उपस्थित होते.निवेदनात म्हटले आहे की, देशातील लाखो होतकरू आणि मेहनती विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारा हा 'नीट पेपरफुटी घोटाळा' अत्यंत गंभीर स्वरूपाचा आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सी () मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले असून, या घटनेमुळे देशातील शिक्षण आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. बहुजन समाज पार्टीने विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आणि मेहनतीचा प्रश्न उपस्थित करत म्हटले आहे की, देशातील गरीब, दलित, मागासवर्गीय आणि मध्यमवर्गीय कुटुंबांतील विद्यार्थी कर्ज काढून, रात्रंदिवस अभ्यास करून डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहतात.

# स्पर्धा परिक्षेसाठी जिद्द, चिकाटी व मेहनत ही त्रिसुत्रीच खरा मंत्र : महेश जंजिरे

## 'युपीएससी'तून थेट असिस्टंट कमांडंटपदी नियुक्ती झाल्याबद्दल 'जिल्हा मराठा'तर्फे झाला विशेष गौरव!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्पर्धा परीक्षांमधील यशासाठी चांगल्या भौतिक सुविधा व मजबूत आर्थिक परिस्थिती या बाबी अजिबातच गरजेच्या नाहीत. त्यासाठी फक्त जिद्द, चिकाटी व मेहनत ही त्रिसुत्रीच खरा मंत्र आहे, असे प्रतिपादन केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत केंद्रीय पोलिस दलात थेट असिस्टंट कमांडंट या पदावर नियुक्ती झालेले महेश जंजिरे यांनी केले.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वात मोठ्या शिक्षण संस्थेच्या येथील रेसिडेन्सिअल हायस्कूलचे माजी विद्यार्थी महेश ईश्वर जंजिरे यांची केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत केंद्रीय पोलिस दलात असिस्टंट कमांडंट या पदावर थेट निवड झाली असून, खडतर प्रशिक्षणानंतर ते आता देशसेवेत रुजू होत आहेत. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे व सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांच्या हस्ते जंजिरे यांचा एका खास समारंभात विशेष गौरव करण्यात आला. त्यावेळी दरे बोलत होते. संस्थेच्या खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, सहसचिव मुकेश मुळे, कार्यकारिणी सदस्या अरुणा काळे, बांधकाम व्यावसायिक असलेले महेश यांचे वडील ईश्वर जंजिरे, महिला बचत गटाच्या नेत्या असलेल्या आई सुनीता जंजिरे, वास्तुविशारद पत्नी काजल जंजिरे, 'रेसिडेन्शियल'चे प्राचार्य धनंजय म्हस्के, उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, संस्थेच्या शिवाजी सहकारी भांडाराचे अध्यक्ष प्रा. रवींद्र देवढे, शिक्षक नेते प्रा.



डॉ. सुधाकर सुंबे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, पालक, कर्मचारी व विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरे व आठरे पाटील यांनी जंजिरे यांच्या 'युपीएससी'तील अभूतपूर्व यशाचे कौतुक केले. ग्रामीण भागातील तसेच परिस्थितीशी झगडत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी महेश जंजिरे यांची 'युपीएससी'तून थेट असिस्टंट कमांडंट या पदावर बाजी मारल्याची ही यशोगाथा प्रेरणादायी आहे, अशा शब्दांत या दोन्ही पदाधिका–यांनी महेश जंजिरे यांचा गौरव केला.

महेश जंजिरे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेबाबत विशेष मार्गदर्शन केले. ते म्हणाले, ''राज्य व देश पातळीवरील स्पर्धा परीक्षेत मराठी मुलांचा टक्का पूर्वी फारच कमी होता. आता तो वाढत असला तरी अपेक्षेएवढा नाही. अनेक विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या भौतिक सुविधा व मजबूत आर्थिक परिस्थिती याशिवाय स्पर्धा परीक्षेत यश मिळूच शकत नाही, असा न्यूनगंड आहे. परंतु ते साफ चुकीचे असून, जिद्द, चिकाटी व मेहनत या त्रिसुत्रीची प्रभावी अंमलबजावणी करणा–यांना स्पर्धा परिक्षेतील यशापासून कोणीही रोखू शकत नाही.''

'रेसिडेन्शियअल'चे प्राचार्य धनंजय म्हस्के यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचा हेतू विशद केला.

### महेश जंजिरे यांना विद्यार्थ्यांचा गराडा व अन् प्रश्नांची सरबत्ती !

**कार्यक्रमानंतर खाकी वर्दीतील रुबाबदार व्यक्तिमत्व दिसत असलेल्या महेश जंजिरे यांना उपस्थित विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी कुतुहलापोटी अक्षरशः गराडा घातला. अनेकांनी त्यांच्या सह्या घेतल्या तर काहींनी त्यांच्या वर्दीकडे चौकस कटाक्ष टाकीत महेश यांचेशी हस्तांदोलन करण्यावर भर दिला. काही चुणचुणीत विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच काही उत्साही पालक यांनी महेश यांच्यावर राज्य व केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षांचा अभ्यासक्रम, अभ्यासाची पद्धत, वाचनाची सवय, सामान्य ज्ञान, विषयांची निवड यासह इतर विविध प्रश्नांची सरबत्ती केली. महेश जंजिरे यांनीही स्वतःच्या खास शैलीत विद्यार्थी व पालकांना ओघवत्या व अत्यंत सोप्या भाषेत ही माहिती दिली. इतकेच नव्हे, तर स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याची जिद्द असलेल्यांना आपण सर्वतोपरी मदत व मार्गदर्शन करु, असेही त्यांनी आश्वासित केले.**

उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, प्रा. रवींद्र देवढे, प्रा. सुधाकर सुंबे आदींनी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

## जाणीव फाऊंडेशनला उत्कृष्ट रक्तदान शिबिर संयोजक गौरव प्रदान





दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** समाजभान ठेऊन सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असलेल्या जाणीव फाऊंडेशनला जनकल्याण रक्तपेढीच्या वतीने उत्कृष्ट रक्तदान शिबिर संयोजक गौरव प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अरविंद पारगावकर, जनकल्याण रक्तपेढीचे संस्थापक अध्यक्ष डॉ रवींद्र साताळकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्रचे प्रांत प्रमुख प्रा नानासाहेब जाधव, रक्तपेढीचे अध्यक्ष अभय मेस्त्री, कार्यवाह सतीश इंदानी आदींच्या हस्ते जाणीव फाऊंडेशनचे ॲड व इंजिनीयर कैलाश दिघे, ॲड विक्रम वाडेकर विश्वस्त मोहटादेवी संस्थान, कर सल्लागार विकास जोशी व इतरांनी गौरव स्वीकारला.

जाणीव फाऊंडेशन गेली १० वर्षे सातत्याने ३१ डिसेंबरला दारूच्या बाटल्या रित्या करण्यापेक्षा रक्ताच्या पिशव्या भरा असे आवाहन करून रक्तदान शिबिरे आयोजित करत आहे. कोरोना महामारीच्या काळात शिबिरे बंद होती, रक्ताचा प्रचंड तुटवडा होता. अशा कठीण लॉकडाऊनच्या परिस्थिती मध्येही जाणीव फाऊंडेशनच्या सदस्यांनी रक्तपेढीत जाऊन रक्तदान करून रुग्णांना मोठा दिलासा दिला होता.

याच सातत्यपूर्ण सामाजिक बांधिलकीची दखल घेत हा गौरव करण्यात आला. अशा गौरवामुळे सामाजिक कार्य करण्यास कार्यकर्त्यांना अधिक प्रेरणा मिळते, असे मनोगत मोहटादेवी ट्रस्ट चे विश्वस्त व जाणीव फाऊंडेशनचे ॲड विक्रम वाडेकर यांनी व्यक्त केले. जाणीव फाऊंडेशन वर्षभर विविध जनजागृतीचे उपक्रम राबवत असते. नायलॉन मांजा बंदी वर गेली ५-६ वर्षे सातत्याने आवाज उठवून, पाठपुरावा केल्यामुळे त्याचा वापर या वर्षी नगण्य झाला आहे. तिळगुळ घ्या अन् वाहतूक नियम पाळा असे आवाहन करून रस्ते वाहतूक सुरक्षा जागृती कार्यक्रम राबविला जातो. वृक्षारोपण व संवर्धन, स्वच्छता अभियान, गरिबांसाठी विमा योजना, करिअर गायडन्स इत्यादी कार्यक्रम जाणीव फाऊंडेशनचे सर्व मान्यवर सदस्य लोकसहभागातून राबवीत असतात.

## साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या शासकीय आरोग्य योजनांचे ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते लोकार्पण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**टाकळी ढोकेश्वर–** आज धकाधकीच्या युगात बहुतेकांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे विविध आजारांना निमंत्रण दिले जात आहे. असे अनेक आजार आहेत की ज्यावर सर्व सामान्य माणसाला महागडे उपचार घेणे परवडत नाही. त्यामुळे केंद्र व राज्य शासनाने विविध आरोग्यदायी योजना सुरू केल्या आहेत. या सर्व योजना साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असून त्याच्या सर्वसामान्य माणसाला मोठा लाभ होत आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर येथील साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल तसेच विविध शासकीय आरोग्य योजना व हिमोफिलिया ट्रीटमेंट सेंटरचा लोकार्पण सोहळा मंत्री विखे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार काशिनाथ दाते हे होते.

स्वागत व प्रास्तविक करताना साई सावलीचे चेअरमन डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी सर्व योजनांची माहिती दिली. परिसरातील कोणत्याही रूग्णाला आर्थिक अडचणीमुळे उपचार अडू नये हा आमचा प्रयत्न



असतो. यावेळी जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी, आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब बांडे, आयुष्यमान भारत योजनेचे जिल्हा प्रमुख डॉ. अनिकेत भालसिंग, विनायक देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य विश्वनाथ कोरडे, वसंत चेडे, राहुल शिंदे, प्रशांत गायकवाड, माजी सरपंच शिवाजी खिलारी, खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन बाबासाहेब खिलारी, अशोक फडके, विलास झावरे, नारायण झावरे, साई सावली चे उपाध्यक्ष डॉ. शौकत सय्यद, संचालक डॉ. स्वाती खिलारी , डॉ. संतोष ढवळे, डॉ. मुकेश ठुबे, डॉक्टर विजय पुरी, डॉक्टर जयवंत निमसे, डॉक्टर तुषार धुमाळ व परिसरातील सर्व गावांमधील विविध क्षेत्रातील पदाधिकारी व रुग्ण उपस्थित होते.

## धोंड्यावर महागाईची संक्रांत!

### मोदींनी वर्षभर सोनं खरेदी करू नका'' या आवाहनानंतर सराफ बाजारात शांतता

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** लग्नसराई, सण-उत्सव आणि पारंपरिक ''धोंडा'' कार्यक्रमांमध्ये सोन्याला विशेष महत्त्व असते. मात्र वाढती महागाई, गगनाला भिडलेले सोन्याचे दर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ''वर्षभर सोनं खरेदी करू नका'' असे केलेल्या आवाहनानंतर सराफ बाजारात कमालीची शांतता दिसून येत आहे. याचा थेट परिणाम धोंडा परंपरेवर होत असून, यंदा अनेक जावईबापूंना अपेक्षेप्रमाणे सोन्याचे दागिने मिळणार का, याबाबत चर्चा रंगू लागल्या आहेत.

गेल्या काही महिन्यांत सोन्याच्या दरांनी ऐतिहासिक उच्चांक गाठला आहे. त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले असून, अनेकांनी सोन्याच्या खरेदीकडे पाठ फिरवली आहे. विशेषतः ग्रामीण भागात धोंडा कार्यक्रमात सोन्याची अंगठी, चैन किंवा इतर दागिने देण्याची परंपरा आहे. मात्र वाढत्या दरामुळे अनेक कुटुंबांनी यंदा ''सोन्याऐवजी प्रतीकात्मक भेटवस्तू'' देण्याचा पर्याय स्वीकारण्याची तयारी सुरू केली आहे. सराफ व्यावसायिकांच्या मते, बाजारात ग्राहकांची गर्दी पूर्वीच्या तुलनेत लक्षणीय घटली आहे. ''लोक फक्त दर विचारून जात आहेत, खरेदी मात्र टाळत आहेत,'' अशी प्रतिक्रिया काही व्यावसायिकांनी दिली. दरम्यान, सोशल मीडियावरही ''धोंडा आणि सोनं'' हा चर्चेचा विषय ठरत असून, ''जावईबापूंनी अपेक्षा कमी ठेवाव्यात'' अशा विनोदी प्रतिक्रिया व्हायरल होत आहेत.

## अहिल्यानगर महानगरपालिका व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त सत्कार सोहळा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** परिचारिका या आपल्या कुटुंबाची, परिवाराची तसेच हॉस्पिटलची जबाबदारी सांभाळून रुग्णांची सेवा करत असतात. कोरोनाच्या महाभयंकर संकट काळामध्ये आपल्या जीवाची परवा न करता दुसऱ्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी त्यांनी अहोरात्र काम केले. देशाच्या आरोग्य सेवेमध्ये परिचारिकांचा मोठा वाटा असून त्या समाजातील सेवा, समर्पण आणि आरोग्य सेवेचा मुख्य कणा आहेत. परिचारिकांच्या माध्यमातून महापालिकेची आरोग्य सेवा नागरिकांच्या घरापर्यंत घेऊन जाण्यास मदत होत असल्याचे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिका व रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त आयोजित सत्कार सोहळ्यात त्या बोलत होत्या.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, मनपा महिला बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचे अध्यक्ष सुनील



कटारिया, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, पुष्कर कुलकर्णी, सुनील मुथा, राजेश परदेशी, अमर गुरव, मनोरमा थोरात, सुवर्णा शेलार, मनीषा सोनवणे, वर्षा कुलथे, संगीता कावरे, डॉ. वृषाली अरुण, शितल मडावी, प्रतिभा राऊत, कविता खिलारी, शिरीन शेख आदींसह अधिकारी, कर्मचारी व परिचारिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, ''महापालिकेच्या परिचारिकांच्या आरोग्य सेवेला महानगरपालिकेच्या वतीने सलाम आहे. पूर्वी बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये सुमारे ३००० प्रसूती होत होत्या, आता त्या १५०० वर आल्या आहेत. पुढील काही दिवसांमध्ये बाळासाहेब देशपांडे दवाखाना नवीन ठिकाणी स्थलांतरित होणार असून रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. जिल्ह्यामध्ये बाळासाहेब देशपांडे दवाखान्याचा नावलौकिक परिचारिकांमुळेच मिळाला आहे. त्यांच्या माध्यमातून बहुतांश प्रसूती नॉर्मल पद्धतीने केल्या जात होत्या. यापुढील काळातही महानगरपालिकेच्या माध्यमातून महिलांना अधिकाधिक आरोग्य सुविधा देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.

ते पुढे म्हणाले की, ''आरोग्य संदर्भातील माहिती शासनाला ऑनलाइन पद्धतीने तातडीने द्यावी लागते. त्यामुळे पुढील काळात परिचारिकांना टॅब दिले जाणार असून त्या माध्यमातून अधिक जलद गतीने आरोग्याची माहिती शासनापर्यंत पोहोचवता येईल.

दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, ''आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त परिचारिकांचा गुणगौरव व सत्कार सोहळा होणे गरजेचे आहे. यासाठी रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल यांनी पुढाकार घेऊन महापालिकेच्या परिचारिकांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्याचे काम केले आहे. पुढील काळात महानगरपालिका आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवणार आहे.

## कामरगाव इंग्लिश स्कूलच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा ग्रामपंचायतीकडून गौरव

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील कामरगाव येथील भारत सर्व सेवा संघ संचलित कामरगाव इंग्लिश स्कूलच्या दहावी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा कामरगाव ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. विद्यालयाचा दहावीचा निकाल तब्बल ९४.७३ टक्के लागल्याने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करताना ग्रामीण भागातून अधिकारी घडविण्यासाठी गावात स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासिकेची उभारणी करण्याचा मानसही उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

हनुमान मंदिर सभागृह, कातोरेवाडी येथे आयोजित या सत्कार समारंभात विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व शुभेच्छा देऊन गौरव करण्यात आला. शाळेच्या गुणवत्ता



यादीत प्रथम क्रमांक कु. धनश्री बाळासाहेब ठोकळ हिने ९२.६० टक्के गुण मिळवत पटकावला. द्वितीय क्रमांक हर्षदा अविनाश आंधळे हिने ८६.८० टक्के गुणांसह मिळविला, तर समृद्धी अंकुश ठोकळ हिने ८६.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. चतुर्थ क्रमांक किशोर विजय ठोकळ (८४.८० टक्के) आणि पाचवा क्रमांक सुयश घनश्याम कातोरे (७९.२० टक्के) यांनी प्राप्त केला. गुणवंत विद्यार्थ्यांचे ग्रामपंचायत, ग्रामस्थ आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विशेष अभिनंदन करण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायतचे विद्यमान प्रशासक तथा माजी सरपंच संदिप ढवळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना युवकांनी व्यसनाधीनतेपासून दूर राहण्याची गरज अधोरेखित केली. ते म्हणाले की, ग्रामीण भागातील अनेक सुशिक्षित युवकदेखील व्यसनाच्या आहारी जात असल्याचे चित्र चिंताजनक आहे. करिअर घडविण्याच्या महत्त्वाच्या वयात चुकीच्या मार्गावर गेल्यास संपूर्ण आयुष्यावर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे युवक-युवतींना योग्य दिशा देण्यासाठी गावात स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी स्वतंत्र अभ्यासिका सुरू करण्यात येणार असून, त्यातून ग्रामीण भागातून अधिकारी घडविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

या कार्यक्रमास माजी सरपंच वसंतराव ठोकळ, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन सुदाम ठोकळ, माजी सरपंच तुकाराम कातोरे, लक्ष्मण शामराव ठोकळ, शिवाभाऊ सोनवणे, पत्रकार हेमंत साठे, गणेश बनकर, कैलास झरेकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच ग्रामविकास अधिकारी सचिन राठोड, ग्राम महसूल अधिकारी संतोष मांडगे, माजी आरोग्य अधिकारी बापूसाहेब शेळके, उद्योजक गणेश ठोकळ, प्रदीप साठे, वैभव ठोकळ, माजी सैनिक राजेंद्र शिंदे, रायचंद ठोकळ, संदिप गुंजाळ, अशोक कातोरे, योगेश ठोकळ, सुलतान शेख, संजय ठोकळ, आदम शेख, रावजी ठोकळ, दत्तू ठोकळ, नाना ठोकळ, शंकर ठोकळ, आनंदा ठोकळ तसेच ग्रामपंचायत कर्मचारी संतोष साठे, फैयाज शेख, संदिप पाडेकर, गणेश खाडे आदी उपस्थित होते.

## आनंदधाम येथे अवडंबर विना परंतु भक्तिमय वातावरणात मोठी दीक्षा समारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भगवान महावीर स्वामींनी साधु – साध्वी, श्रावक – श्राविका या चतुर्मय तीर्थांची स्थापना करुन आत्मकल्याणाचा मार्ग मुमुक्षु साधकांसाठी प्रशस्त केला. म्हणूनच महावीर स्वामी तीर्थंकर परमात्माच्या रुपाने वंदनीय – पूजनीय आहेत. असे अनंत तीर्थंकर परमात्मा या भू – तलावर होऊन गेले आहेत व जिनशासन चतुर्विध तीर्थ रुपाने अबाधित आहे.

अहिल्यानगरच्या पुण्य भूमीवर राष्ट्रसंत आचार्य सम्राट प पू श्री आनंदऋषिजी म सा, ही दिव्य विभूति १९ व्या शतकात होऊन गेली. परंतु त्यांच्या पदस्पर्शाने, कार्य कर्तृत्वाने पावन उर्जामय झालेली आनंदधाम ची धरा भक्तांसाठी पवित्र श्रध्दा स्थान व तीर्थक्षेत्र आहे. आत्मकल्याणाची श्रेणी पार करताना अनेक मुमुक्षु साधकांनी या धरावर गृहस्थ धर्मातून साधु जीवनात प्रवेश केला आहे.

३ मे २०२६ रोजी पिंपळगाव बसवंत येथील श्रीमती विजयाजी कोचर यांची दीक्षा उपप्रवर्तिनी पू श्री कंचनकवरजी म सा यांच्या नेश्राय मध्ये या ठिकाणी अत्यंत साध्या स्वरुपात संपन्न झाली व श्री विदिताजी म सा म्हणून त्यांचे संयमी साध्वी जीवनाला सुरुवात झाली. या छोटय़ा दीक्षेनंतर साधु आचरणासाठी अत्यंत अनमोल व महत्वपूर्ण असलेले पाच महाव्रतांचे आरोपण करण्यात येते. श्री विदिताजी म सा यांची ही मोठी दीक्षा विधि महाराष्ट्र प्रवर्तक पू श्री कुंदनऋषिजी म सा, प्रबुध्द विचारक पू श्री आदर्शऋषिजी म सा, संस्कार दिवाकर पू श्री आलोकऋषिजी म सा* इत्यादी साधु – साध्वीजी महाराजांच्या सानिध्यात १९ मे, मंगळवार रोजी संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंगलाचरण, २४ तीर्थंकर स्तवन रुपी चोवीसी, श्री पुच्छिस्सुणं स्तोत्राचे पठन करण्यात आले. मोठ्या दीक्षा विधिसाठी आवश्यक असलेले श्री दशवैकाविक सूत्राचे ४ अध्ययन चे वाचन झाले व श्री विदिताजी म सा यांना मोठी दीक्षा देण्यात आली. श्री आदर्शऋषिजी म सा, यांनी मोठय़ा दीक्षेचे महत्व सांगितले.

या कार्यक्रमासाठी श्रध्दाळू भक्तगण व ४० – ४५ संत – सतियाजी महाराज उपस्थित होते. तसेच दशमेशनगर (छ. संभाजीनगर) येथिल श्री संघाने श्री करुणाश्रीजी म सा व श्री नविनज्योतिजी म सा, यांचा चातुर्मास करण्याची भावना व विनंती प्रवर्तकश्रीजींना केली. प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म सा यांनी त्यास स्वीकृती दिली.

मंगलपाठ द्वारा कार्यक्रमाची सांगता झाली. आडंबर विना सादगीमय कार्यक्रम संपन्न करण्याची विशेष परंपरा आचार्य भगवंतांपासून आजपर्यंत चालू आहे. अशा वातावरणात अनायास फक्त श्रध्दा – भक्ति ला प्राधान्य दिले जाते. दिखावट व सजावट नसल्याने उपस्थितांसाठी प्रमुख कार्यक्रम केन्द्रस्थानी असते.

## पाकिस्तानमधील ऐतिहासिक नावांचे पुनर्स्थापन स्वागतार्ह – जयंत येलुलकर

### शीख धर्मगुरूंच्या पवित्र जन्मस्थळांच्या जतन व सुशोभीकरणाचीही मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** पाकिस्तानमधील शहरासह पंजाब प्रांतातील अनेक भागांना स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदू देव-देवतांची, ऐतिहासिक व्यक्तींची तसेच सांस्कृतिक वारशाशी निगडित नावे होती. फाळणीनंतर अनेक ठिकाणांची नावे बदलून नव्याने मुस्लिम नावे देण्यात आली होती. मात्र अलीकडे पंजाब प्रांत प्रशासनाने पुन्हा काही ऐतिहासिक व पारंपरिक नावांचा विचार सुरू केल्याची बाब अत्यंत स्वागतार्ह असून, ती सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक समन्वय आणि इतिहास संवर्धनाला प्रेरणा देणारी आहे, असे मत सामाजिक अभ्यासक रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलुलकर यांनी व्यक्त केले आहे.

भारत-पाकिस्तान फाळणीपूर्व पंजाबचा इतिहास हा विविध धर्म, संस्कृती आणि परंपरांचा संगम राहिला आहे. शीख साम्राज्याचे संस्थापक यांचे जन्मस्थळ येथे असून, शीख धर्माचे चौथे गुरु यांचा जन्म येथे झाला होता. ही स्थळे संपूर्ण शीख समाजासाठी अत्यंत पवित्र आणि प्रेरणादायी मानली जातात.

इतिहास हा कोणत्याही एका धर्माचा किंवा समुदायाचा नसून तो संपूर्ण मानवजातीचा सांस्कृतिक ठेवा असतो. त्यामुळे पाकिस्तान सरकारने ज्या प्रकारे ऐतिहासिक नावांच्या पुनर्स्थापनेचा सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारण्यास सुरुवात केली आहे, तो जागतिक स्तरावर शांतता, सहअस्तित्व आणि एकात्मतेचा संदेश देणारा ठरेल. यामुळे पाकिस्तानची प्रतिमा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक सकारात्मक उंचावण्यास मदत होईल.

याचे औचित्य साधून पंजाबमधील शीख धर्मगुरू व ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांच्या जन्मस्थळांचे जतन, सुशोभीकरण आणि पर्यटनदृष्ट्या विकास करण्यात यावा. त्या परिसरात माहिती केंद्र, चित्रदालन, ऐतिहासिक छायाचित्रे, डिजिटल माहिती फलक, संशोधन साहित्य तसेच पर्यटकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यास जागतिक स्तरावरील पर्यटक, अभ्यासक आणि शीख बांधवांसाठी हे स्थळ प्रेरणास्थान ठरतील. शीख साम्राज्याचे संस्थापक म्हणजे महाराजा रणजीत सिंह होय. त्यांचा जन्म १३ नोव्हेंबर १७८० रोजी गुजराण वाला येथे झाला. हे ठिकाण पाकिस्तान मधील पंजाब प्रांतात येते.त्यांना ''शेर-ए-पंजाब'' म्हणूनही ओळखले जाते. त्यांनी १९व्या शतकात पंजाबमध्ये शक्तिशाली शीख साम्राज्य उभारले.

गुरू राम दास यांचा जन्म लाहोर येथे झाला होता.ते शीख धर्माचे चौथे गुरु होते आणि त्यांनी पुढे अमृतसर शहराची स्थापना केली. अमृतसरमधील प्रसिद्ध हरमिंदर साहिब (सुवर्ण मंदिर) हे शीख धर्मातील अत्यंत पवित्र स्थळ त्यांच्या कार्याशी संबंधित आहे. इतिहास जतन करणे म्हणजे भविष्यातील पिढ्यांना सांस्कृतिक समन्वयाची शिकवण देणे होय. त्यामुळे अशा ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी सर्व स्तरांतून सकारात्मक प्रयत्न होणे आवश्यक असल्याचेही जयंत येलुलकर यांनी म्हटले आहे.

## महापालिकेच्या विकासाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी प्राधान्याने काम – महापौर ज्योतीताई गाडे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महानगरपालिका ही नागरिकांना मूलभूत सेवा-सुविधा देणारी संस्था असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित प्रश्न सोडविणे हीच खरी लोकसेवा आहे. शहरातील प्रत्येक प्रभागामध्ये विकासकामे करताना केवळ तात्पुरती नव्हे तर कायमस्वरूपी आणि नियोजनबद्ध कामे होणे गरजेचे आहे. एकदा विकासकामे योग्य पद्धतीने मार्गी लागल्यानंतर तीच कामे पुन्हा करण्याची वेळ येत नाही. नागरिकांना चांगले रस्ते, नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था तसेच ओपन स्पेसच्या माध्यमातून चांगली सार्वजनिक जागा उपलब्ध व्हावी हीच आपली प्राथमिकता असल्याचे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

प्रभाग क्रमांक तीनमधील दळवी मळा, सर्वोदय कॉलनी आणि सागरीका कॉलनी येथे ओपन स्पेस सुशोभीकरण व पेव्हिंग ब्लॉक बसविण्याच्या कामाचा शुभारंभ महापौर ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी अशोक पाटील, स्वप्नील गोरे, विजया पाटील, अजय ख्रिस्ती, रामभाऊ ठाणगे, रवींद्र चोबे, वैशाली सूर्यवंशी, सुदाम वाबळे आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे पुढे म्हणाल्या की, ''प्रभागातील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. जमिनीअंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या लाईन, ड्रेनेज लाईन, स्वच्छता व्यवस्था, रस्ते आणि प्रकाश व्यवस्था यांसारखी अनेक कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात आली आहेत. नागरिकांच्या सहकार्याने समस्या मुक्त आणि आदर्श प्रभाग निर्माण करण्याचा आपला संकल्प असून एकामागून एक विकासकामे मार्गी लागत आहेत.

त्या पुढे म्हणाल्या की, ''ओपन स्पेसचे सुशोभीकरण हे फक्त सौंदर्यीकरण नसून नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना परिसरात चांगली व सुरक्षित जागा मिळावी, यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. विकासकामांमध्ये पारदर्शकता ठेवत नागरिकांना विश्वासात घेऊन काम करण्यावर भर दिला जात आहे.

यावेळी परिसरातील नागरिकांनी महानगरपालिकेच्या कामांबाबत समाधान व्यक्त केले. ''प्रभागामध्ये पाणी, स्वच्छता, लाईट आणि रस्त्यांची कामे मार्गी लागली असून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी महापौर ज्योतीताई गाडे सातत्याने प्रयत्नशील असतात. त्या महिलांशी थेट संवाद साधून पाणी, स्वच्छता, कचरा गाडी याबाबत विचारपूस करतात. त्यामुळे नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी विश्वास निर्माण झाला असून आम्ही त्यांच्या कामावर समाधानी आहोत,'' अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## जाधव यांचे जीवन प्रेरणादायी ठरले– प्रा.पठारे

### जाधव व पाटील यांना श्रद्धांजली



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सुषमा जाधव या आपल्यातून गेल्या असल्या तरी त्यांचे जीवन प्रेरणादायी होते,असे प्रतिपादन सीएसआरडीचे संचालक प्रा.सुरेश पठारे यांनी केले.

संस्थेच्या जेसिपीआर (पत्रकारिता अभ्यासक्रम ) च्या माजी विद्यार्थिनी आणि अहिल्यानगर आकाशवाणीच्या माजी उद्घोषिका ॲड.सुषमा जाधव – अमर यांचे अलीकडेच निधन झाले.त्याच प्रमाणे जेसिपीआरचे माजी विद्यार्थी व जिल्हा बँकेचे जनरल मॅनेजर सुरेश पाटील यांचे वडील आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष रामराव पाटील यांचेही नुकतेच निधन झाले. जाधव व पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सीएसआरडी संस्थेत आयोजित सभेत श्री.पठारे बोलत होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी सुभाष लांडे ,न्यायधार संस्थेच्या अध्यक्ष ॲड.निर्मला चौधरी आदी उपस्थित होते. पठारे म्हणाले,पत्रकारिता अभ्यासक्रमात मानवी मूल्ये शिकविली जावीत, असा सुषमा जाधव यांचा आग्रह असे. यावेळी श्री.लांडे यांनी कॉमेड भास्करराव जाधव हे कम्युनिस्ट चळवळीचे अग्रगण्य नेता होते.त्यांचे संस्कार सुषमा हिच्यावर होते,असे सांगितले. कार्यक्रमात ॲड.निर्मला चौधरी,प्रा.रवींद्र सातपुते, एसटीचे माजी अधिकारी सुनिल ओहोळ,सामाजिक कार्यकर्त्या संध्या मेढे,आकाशवाणीचे अधिकारी मुज्जमिल पटेल, दिलीप चव्हाण,कॉ.प्रवीण सोनवणे,दत्ता परभणे यांनी विचार व्यक्त केले.जेष्ठ पत्रकार कैलास ढोले यांनी सुरेश पाटील यांचा मेसेज तर सुष्मिता अय्यंगार यांनी अलका जैन आणि आकाशवाणीतील निवेदिका वृषाली पोंदे यांचे मेसेज वाचून दाखविले.प्रास्ताविक प्रियदर्शन बंडेलु यांनी केले तर सूत्रसंचालन महेबुब सय्यद यांनी केले. कार्यक्रमास मनपाच्या माजी प्रसिद्धी अधिकारी नीलिमा बंडेलु,मनपाचे माजी विरोधी पक्ष नेते बहिरनाथ वाकळे,मनपाचे माजी उपायुक्त दिगंबर कोंडा,प्रकाशजीत अमर ,अजिता एडके,तारा सातपुते आदी उपस्थित होते.

## सुनिल सकट यांना दिल्लीची मानद डॉक्टरेट पदवी प्रदान

### आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते गौरव; सामाजिक व पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरण क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणारे महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते सुनिल सकट यांना दिल्लीस्थित 'मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड फाऊंडेशन'च्या वतीने मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली. या मानाच्या पदवीचा स्वीकार आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते त्यांनी केला. यावेळी आमदार जगताप यांनी सकट यांचा सत्कार करून त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी डॉ. काशीनाथ सुलाखे, छावा संघटनेचे प्रदेश युवा सचिव दत्ता वामन, मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते विजय वडागळे, ज्येष्ठ समाजसेवक नामदेवराव चांदणे, मानवी हक्क अभियानचे जिल्हा संघटक अशोक भोसले, राष्ट्रवादी शहर जिल्हा उपाध्यक्ष आनंद राठोड, भाजपा शहर उपाध्यक्ष संतोष शिरसाठ, अँटी रॅगिंग फोर्सचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब शिंदे, ग्राहक मार्गदर्शन मंचाचे भैय्या पठाण, मानवी हक्क अभियानचे जिल्हाध्यक्ष लखन साळवे, सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण साबळे, शिक्षक राहुल जाधव, वंदना सकट आदी उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, सुनिल सकट यांनी कोणत्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता सातत्याने समाजासाठी कार्य केले आहे. सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी पर्यावरण, शिक्षण, आरोग्य आणि मानवतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय काम उभे केले आहे. अशा कार्यकर्त्यांचा सन्मान होणे ही अहिल्यानगरसाठी अभिमानाची बाब आहे. त्यांची कार्यप्रेरणा युवकांसाठी दिशादर्शक ठरेल, असा



विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सुनिल सकट यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही समाजसेवेचा वसा जपत अनेक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव यापूर्वीही महाराष्ट्र शासनाच्या 'साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे समाजभूषण पुरस्काराने' करण्यात आलेला आहे. समाजहिताच्या विविध उपक्रमांत त्यांनी स्वतःच्या खर्चातून योगदान देत अनेकांना मदतीचा हात दिला आहे.

कोरोना महामारीच्या कठीण काळात त्यांनी निष्काम भावनेतून गरजू नागरिकांना मदत केली. विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप, गरजू कुटुंबांना अन्नधान्य सहाय्य, नियमित रक्तदान, शहरात स्वच्छता मोहीम, विविध ठिकाणी वृक्षारोपण व संवर्धन, सामाजिक प्रश्नांसाठी शासन दरबारी पाठपुरावा, न्यायासाठी उपोषण, मोर्चे व आंदोलने अशा विविध माध्यमांतून त्यांनी सातत्याने समाजकार्य केले आहे.

तसेच नवजात मुलींच्या जन्माचे स्वागत करून समाजात सकारात्मक संदेश देणे, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करणे, मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जनजागृती करणे, महिलांना सामाजिक कार्यात पुढाकार घेण्यासाठी प्रोत्साहित करणे अशा उपक्रमांमुळे त्यांची समाजातील ओळख अधिक दृढ झाली आहे.

(पान १ वरून)

## बीएसएनएल-एमटीएनएल पेन्शनधारकांचे आंदोलन

विभागाच्या () हस्तक्षेपाशिवाय आयडीए वाढ आपोआप लागू करण्याची पूर्वीची पद्धत पुन्हा सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी आंदोलनकर्त्यांनी ''पेन्शनधारकांना न्याय द्या'', ''आयडीए वाढ लागू करा'', ''थकबाकी त्वरित अदा करा'' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. पेन्शनधारकांनी त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला असून, भारत सरकार आणि दूरसंचार विभागाने याप्रकरणी आणखी विलंब न करता तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## कवी गोरे यांच्या कवितेतून ग्रामीण संस्कृतीचे जिवंत दर्शन – खासेराव शितोळे

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. गणेश भगत यांनी गणराज प्रकाशनाच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, ग्रामीण भागातील होतकरू कवी आणि साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य गणराज प्रकाशन सातत्याने करत आहे. ग्रामीण विचार, संस्कृती आणि माणुसकी समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी साहित्य प्रकाशनाची महत्त्वपूर्ण भूमिका संस्था पार पाडत आहे. 'शब्द फुलांची ओंजळ' हे गणराज प्रकाशनाचे तब्बल २०७ वे पुस्तक असल्याचे त्यांनी अभिमानाने नमूद केले.
जयंत येलुलकर यांनी कवी सखाराम गोरे हे व्यासंगी साहित्यिक असून हा त्यांचा सातवा काव्यसंग्रह असल्याचे सांगितले. त्यांच्या कवितांमध्ये जीवनातील सहजभाव, निसर्ग, माणुसकी आणि ग्रामीण जगण्याचे वास्तव प्रभावीपणे उमटले आहे. ग्रामीण मातीतली नाळ त्यांच्या कवितांमधून स्पष्ट जाणवते. त्यांच्या शब्दरचनेत रांगड्या बोलीभाषेची गोडी असून ती वाचकांच्या मनाला थेट स्पर्श करते, असे त्यांनी नमूद केले.
कविवर्य चंद्रकांत पालवे यांनी कवी गोरे यांच्या संघर्षमय आणि दारिद्र्यपूर्ण जीवनप्रवासाचा उल्लेख करताना सांगितले की, त्यांनी आपल्या कवितांमधून वास्तव जीवनाचे प्रभावी प्रतिबिंब उमटविले आहे. त्यांच्या ग्रामीण कविता खऱ्या अर्थाने समाजमनाला भिडणाऱ्या असून युवकांना प्रेरणा देणाऱ्या असल्याचे स्पष्ट केले.
प्रा. भगवान काटे यांनी ग्रामीण भागातील जीवनमूल्ये, संस्कार आणि संवेदना जपणारे साहित्य समाजासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. सखाराम गोरे यांच्या कवितांमध्ये ग्रामीण जीवनातील वास्तव, नात्यांतील ऊब आणि माणुसकीचा स्पर्श स्पष्ट जाणवतो. विशेषतः ग्रामीण स्त्रीजीवनाचे प्रभावी चित्रण त्यांच्या कवितेत आढळते. कष्टमय आयुष्य जगणारी, घरातील जबाबदाऱ्या सांभाळणारी, भक्तिभावाने तुळशीला पाणी घालणारी संस्कारशील स्त्री आणि कुटुंबाचा केंद्रबिंदू असलेली चैतन्यमय कारभारीण अशा विविध रूपांचे जिवंत चित्रण त्यांच्या कवितांमधून दिसून येते. आईच्या ममत्वाचा आणि त्यागाचा भावनिक आविष्कारही त्यांच्या कवितांमध्ये प्रकर्षाने जाणवतो, असे त्यांनी सांगितले.
यावेळी कवी सखाराम गोरे यांनी आपल्या साहित्य प्रवासाविषयी मनोगत व्यक्त केले. बालपणापासूनच लेखणीचा छंद जडला. अवांतर वाचनातून शाहीर अण्णाभाऊ साठे आणि अमर शेख यांच्या विचारांचा प्रभाव पडला. त्यांच्या प्रेरणेने शाहिरी पोवाडे रचण्यास सुरुवात केली. पुढे कवितेचा कंठ फुटला आणि कविता नसानसांत भिनली. कविता ही आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनल्याचे त्यांनी सांगितले.
अध्यक्षीय समारोपात खासेराव शितोळे यांनी पुन्हा एकदा कवी गोरे यांच्या कवितेतील संवेदनशीलता, जीवनानुभव आणि अंतर्मनाला स्पर्श करणाऱ्या भाषाशैलीचे कौतुक केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सुभाष बर्वे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ढमाले परिवार आणि आठरे परिवारातील सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## हिंदू देवस्थानांच्या अस्तित्वावर घाला घालणारा 'इनाम निर्मूलन कायदा' तात्काळ मागे घ्या!

देवस्थानची 'मूर्ती' ही एक 'कायदेशीर व्यक्ती' ( ) मानली जाते आणि या जमिनींची मालकी त्या देवतेकडे असते. मात्र, प्रस्तावित कायद्याच्या कलम ३ आणि ४ नुसार, ही सर्व इनामे रद्द करून, त्या जमिनी वहिवाटदार किंवा पुजाऱ्यांच्या नावे 'मालक' म्हणून वर्ग करण्याचा घाट घातला जात आहे. यामुळे पिढ्यानपिढ्या मंदिरांच्या सेवेसाठी वापरल्या जाणाऱ्या जमिनींचे व्यापारीकरण होईल आणि भविष्यात ही मंदिरे परावलंबी होतील. वक्फ बोर्डाला सवलत, हिंदू मंदिरांवर अन्याय का? या कायद्यातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, कलम १ उपकलम २ अन्वये वक्फ बोर्डाच्या अखत्यारीतील जमिनींना या कायद्यातून वगळण्यात आले आहे. केवळ हिंदू देवस्थानांच्या जमिनींचे 'निर्मूलन' करणे आणि इतर धर्मीयांच्या संस्थांना संरक्षण देणे, हा प्रकार शासनाच्या निधर्मी धोरणाशी विसंगत असून संविधानाच्या अनुच्छेद १४ मधील 'समानतेच्या अधिकाराचे' उल्लंघन करणारा आहे. एकीकडे वक्फ मालमत्तांना विशेष संरक्षण दिले जात असताना, दुसरीकडे मंदिरांच्या जमिनी बळकावण्यासाठी कायदा करणे, हा दुजाभाव अत्यंत निषेधार्ह आहे. न्यायालयाचे दरवाजे बंद करणारी प्रशासकीय दडपशाही कलम १८ नुसार या कायद्यांतर्गत महसूल अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयाविरोधात दिवाणी न्यायालयात दाद मागता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे. हा भाविकांच्या आणि विश्वस्तांच्या घटनात्मक अधिकारांवर मोठा प्रहार आहे. न्यायालयाचे दरवाजे बंद करून सरकार प्रशासकीय दडपशाही लादू पाहत आहे. तसेच, अतिक्रमणे काढण्याऐवी, १ जानेवारी २०११ पूर्वीपासून ताबा असलेल्या अतिक्रमणधारकांनाच त्या जमिनींची मालकी बहाल करणे म्हणजे देवस्थानच्या मालमत्तेची कायदेशीर लूटच आहे. महासंघाच्या प्रमुख मागण्या: मुदतवाढ मिळावी: शासनाने या मसुद्यावर हरकती नोंदवण्यासाठी दिलेली मुदत अत्यंत अपुरी असून, ती किमान दोन महिन्यांनी वाढवून मिळावी. गुजरातच्या धर्तीवर कायदा करा: शासनाने गुजरातच्या धर्तीवर 'अँटी लँड ग्रॅबिंग ॲक्ट' लागू करून देवस्थान जमिनींना संरक्षण द्यावे. ७/१२ उताऱ्यावर नोंद: देवस्थानच्या जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतरण थांबवण्यासाठी ७/१२ उताऱ्यावर 'देवस्थान जमीन प्रतिबंधित सत्ता प्रकार' अशी स्पष्ट नोंद करावी. तीव्र जनआंदोलनाचा इशारा:
''महाराष्ट्रातील मंदिरांचे वैभव आणि वारसा टिकवण्यासाठी सरकारने या मसुद्याचा पुनर्विचार करावा. जर सरकारने हा हिंदूविरोधी कायदा रेटण्याचा प्रयत्न केला, तर संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र जनआंदोलन छेडले जाईल आणि त्यातून निर्माण होणाऱ्या जनक्षोभाला सर्वस्वी शासन जबाबदार असेल,'' असा इशारा महासंघाने दिला आहे. निवेदन देतेवेळी महाराष्ट्र मंदिर महासंघाचे जिल्हा संयोजक श्री. भरत शिंदे, जिल्हा सहसंयोजक गणेश पलंगे, हिंदू राष्ट्र समन्वय समितीचे अजिंक्य गायकवाड, ह.भ.प. क्षीरसागर महाराज, श्री. राजापुरे, श्री. अमित डोंगरे, श्री. अनिल गीते, श्री. चंद्रकांत लोखंडे, छावा संघटनेच्या सुरेखा सांगळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व धर्मप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना आ. दातेंच्या धडपडीमुळे यश

यांनी प्रशासन व शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत नुकसानग्रस्तांना तातडीने मदत मिळावी, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी वेळोवेळी चर्चा करून प्रस्ताव गतीने पुढे नेण्यास महत्त्वाची भूमिका बजावली.

संकटकाळात शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे नेतृत्व म्हणून आमदार काशिनाथ दाते सर यांची भूमिका यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना शासनाची मदत लवकरात लवकर मिळावी, यासाठी त्यांचे प्रयत्न सुरूच असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.